# History of India

by the author of "Figures of Speech," &c.

# भरतखंडपर्व.

ह्यांत हिंदुस्थानदेशाचा साद्यंत इतिहास

लिहिला आहे.

हा ग्रंथ "शब्दालंकार" नामक ग्रंथकर्त्यानें हिंदु

लोकांचे उपयोगाकरितां आधारावरून रचिला आहे.

आणि

---

तो पुण्याचे ज्ञानप्रकाश छापखा-

न्यांत कृष्णाजी त्रिंबक रानडे याणी

छापून प्रसिद्ध केला.

---

शके १७७३

इसवी सन १८५१

किंमत आणे १०

annas Ten (10)

---

# सूचना.

ग्रंथकर्त्याची अशी इच्छा आहे कीं पृथ्वीवरील द
र एक राष्ट्राच्या इतिहासाचें एक एक पर्व अनुक्रमानें करून
त्याहावें त्यांतील हालीचें पुस्तक प्रथम पर्व आहे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रस्तावना | ५ |
| भाग १ पौराणिक इतिहास ह्मणजे पवित्र इतिहास. | ८ |
| सृष्टिउत्पत्ति. | ८ |
| हिंदु काळगणना. | १२ |
| कृतयुग. | १३ |
| त्रेतायुग. | १४ |
| द्वापारयुग. | १४ |
| भाग २ शालीवाहनाचे पूर्वीचा इतिहास ह्मणजे प्राचीन इति०व० | १६ |
| कलियुग. | १६ |
| युधिष्ठिर शाक वर्षे. ३०४४ | १७ |
| विक्रमशाक वर्षे. १३५ | २३ |
| भाग ३ शालिवाहनाचे पश्चात्चा इतिहास. | २७ |
| हिंदु राजे वर्षे. ११०० | २७ |
| मुसलमानी राज्य ह्मणजे अर्वाचीन इतिहास वर्षे ५००, | ३० |
| मराठे — साताऱ्याचे राज्य वर्षे ५० | ३९ |
| पेशवे. — पुण्याची गादी वर्षे ५० | ४२ |
| इंग्रेजी गादी कलकत्याची वर्षे ७३ | ४६ |
| इंग्रेजी राज्यरीति | ५३ |

# * टिपण.

इतिहासाची व्यवस्था करण्याकरितां, तीन कालसंज्ञा मानल्या आहेत. १ पवित्र. २ प्राचीन. ३ अर्वाचीन. पहिल्या काळांत पुराणांतील कथा आहेत यास्तव इतर देशाचे इतिहासांत हा पवित्रकाळ येतनाहीं; दुसऱ्यांत कलियुगाचे आरंभापासून मुसलमानाच्या संचारापर्यंत जे हिंदुराजे ४२७१ वर्षांत जाहाले, त्याचा इतिहास तपशीलवार नाहीं, परंतु त्यांज विषयीं जें कांहीं माहीत आहे, त्याचा संग्रह या काळांत केला आहे; आणि तिसऱ्या काळांत इकडे मुसलमान लोक आल्या दिवसापासून ह्मणजे ११०० शालिवाहन शकापासून पत्तेवार इतिहास लिहिलेला आहे, त्या इतिहासाचा संग्रह केला आहे; आणि त्यास अर्वाचीन ह्मणजे आलीकडील इतिहास असें ह्मणावें. हे इतिहासाचे भाग व काळ लक्षांत अवश्य ठेविले पाहिजेत.

# प्रस्तावना.

इतिहासाचें ज्ञान फार संतोषकारक व उपयुक्त आहे. मनुष्यास बुद्धि व विचार आहेत ह्मणून त्यास पृथ्वी व तिजवरील पदार्थ कसे उत्पन्न झाले व केव्हां झाले हें समजावें अशी इच्छा होते. नाना प्रकारच्या विद्या व धंदे लोकांमध्यें चालू असतात व नानाप्रकारच्या भाषा व अनेक तऱ्हेचीं राज्यें व लोक आहेत, त्यांची उत्पत्ति जाणली असतां मोटे संतोषास कारण होतें. व इतिहासापासून महत् लाभ आहे. कोणत्या मनुष्यानीं काय कर्मे केलीं? व त्यांचें परिणाम व कारणें काय? व राष्ट्रें अज्ञानदशेंत कशीं आलीं? व ज्ञानदशेंत कोणत्या कारणानीं आलीं? व एकच राष्ट्रास पृथक् पृथक् काळीं या दशा कोणत्या कारणानी प्राप्त झाल्या? व राजाचे राष्ट्राचे स्वभाव कसकसे आहेत? व विद्या कशा वाढल्या? व लहान व मोठीं राज्यें झालीं कशीं? व गेलीं कशीं? व राजकारणांत व सैन्य प्रकरणांत व धर्मांत व नीतींत जे जे लोक प्रमुख नामांकित झाले त्यांचे वर्तणुकीवरून गुण दोष जाणणें. इत्यादि मागल्या काळच्या गोष्टींचें ज्ञान झालें असतां फार लाभ व उपयोग आहे. ह्मणून हें ज्ञान करून घेणें अवश्य आहे.

इतिहास ह्मणजे जाहालेली जी गोष्ट असेल तिचा पक्का विचार करून व पुरावा पाहून व अन्यदेशांचे इतिहासांशीं

मिळवून व ताळा घालून जें खरें वर्तमान आढळेल तेंच लिहून ग्रंथ केलेला. या ग्रंथासमात्र इतिहास ह्मणावें इतरांस इतिहास ह्मणूंनये. पंचोपाख्यानासारखीं जीं पुस्तकें आहेत तीं मिथ्या जाणावीं. फार प्राचीन काळचे इतिहास लिहिण्यास मुख्य आधार जुन्या पोथ्या, लेणीं, कवनें, बखरी, सनदा पत्रें, दंतकथा, जुने शिक्के, वगैरे असतात. कारण कीं त्यावेळचे समग्र इतिहास सांपडत नाहींत. जेव्हां पहिल्यानें मनुष्याची उत्पत्ति झाली तेव्हांच तीं लिहूं लागलीं नाहींत. याजमुळें बहुधा फार प्राचीन काळाविषयीं दंतकथा राहिल्या आहेत. परंतु त्याच दंतकथांस दुसरीं प्रमाणें मिळवून त्यांतील वास्तविक काय आहे तें जाणलें पाहिजे. मनुष्यें उत्पन्न झाल्यापासून ग्रंथ लिहूं लागतां येईतोंपर्यंत बहुत अवकाश लागला यास्तव इतिहास लिहिणाराचें मुख्य काम हेंच आहे कीं त्याचा शोध करून खरें ल्याहावें.

इतिहासाचे दोन नेत्र आहेत. एक भूगोलविद्या व दुसरी कालगणना. इतिहासांत झाल्या गोष्टींचें वर्णनमात्र करितात परंतु ती गोष्ट कधीं कोठें झाली त्याचा ठिकाण त्या विद्यांवाचून लागत नाहीं ह्मणून या विद्या इतिहासाचीं अंगे आहेत प्राचीन काळचे लोकानीं सांग इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला नाहीं याजमुळें बहुत देशांचें इतिहासांत घोंटाळा आहे. स्थानाचा व कालाचा ठिकाण लागत नाहीं. परंतु त्यास उपाय नाहीं. हिंदुस्थानाचा इतिहास पाहिला तर आलीकडे थोडे दिवसांचामात्र सवि

स्तर इतिहास मोंगल व इंग्रेज यांणीं लिहिलेला सांपडतो. त्याचे पूर्वी बरोबर इतिहास नाहीं व कांहीं आहे त्यांत कालदेशाचें निरूपण नाहीं. याजमुळें फार संशय पडतो. तथापि हल्लीं राजावळी, राजतरंगिणी, विक्रमबत्तिशी, इत्यादि उपलब्ध ग्रंथ आहेत त्याजवरून जमवाजमव केली पाहिजे.

हिंदु लोकांचे इतिहासाचे तीन काल आहेत १ पौराणिक इतिहास २ शालिवाहनाचे पूर्वीचा इतिहास ३ शालिवाहनाचे पश्चात् इतिहास.

१ पौराणीकी इतिहास ह्मणजे त्यास आधार पुराणें जीं व्यासांनी लिहून ठेविलीं आहेत तीं आहेत. व त्यांतील इतिहास हल्लीचे लोकांचे स्थितीस मिळावयाचा नाहीं कारण कीं सत्य, त्रेत. व द्वापार युगाचे ठाईं जगाची व त्याजवरील लोकांची स्थिति रीती आयुष्यें पराक्रम वगैरे सर्वच भिंन असेल असें वाटतें. व त्याकाळीं ईश्वर मृत्युलोकीं हिंदूलोकांमध्यें वारंवार प्रकट होऊन त्यांस सहाय करीत होता व तेव्हांच्या प्रजा देव राक्षस दैत्य इत्यादि विलक्षण होत्या व अवतार व ऋषी होन होते त्यांतील आतां कांहींच नाहीं.

२ शालिवाहनाचे पूर्वीचा इतिहास ह्मणजे कलियुगाचे आरंभापासून शालिवाहनापर्यंत ह्मणजे ३१७९, वर्षे या काळांत आहेत.

३ शालिवाहनाचे पश्चातचा इतिहास ह्मणजे पहिल्या शके

पासून आजपर्यंत व पुढें जीं येणार वर्षे तीं त्यांत आहेत असें समजावें.

याप्रमाणें तीन कालाचे गाई जगामध्यें कस कसें वर्तमान हिंदुस्थान देशीं झालें त्याचें यथामतीनें पुढें निरूपण केलें आहे. हिंदुस्थानच्या उत्तर भागास आर्यावर्त व पुण्यभूमी अशा संज्ञा आहेत. परंतु संपूर्ण देश हिमालयापासून दक्षिण समुद्र पर्यंत विस्तीर्ण आहे. त्यास भरत खंड ही संज्ञा आहे. ह्मणून या ग्रंथाचें नाव भरत खंड पर्व असें ठेविलें आहे.

---

# भरत खंड पर्व.

## पौराणिक इतिहास

### भाग १

आरंभीं हें जग नव्हतें केवळ धुमधुमाकार होता. नंतर श्रीब्रह्म चित्स्वरूप स्वयंप्रकाश याच्या इच्छेनें जगदाभास निर्माण जाहला. अविद्यामायेचे योगेंकरून त्रिगुण, पंचतत्वें, आदिकरून जाहलीं. सूर्य, चंद्र इत्यादि आपले स्थानी जाहाले. पृथ्वी, जाहाली. व तिजवर तरू व पाषाण व जीव हे चित्रविचित्र ईश्वर आपले इच्छेनें निर्मिता झाला.

असें दिसतें कीं पृथ्वी हल्लीं आहे अशी घडण्यास व तिजवर मृत्तिकादिकांचे इतके थर बसण्यास लक्षावधी वर्षे लागलीं असतील. कारण कीं पहिला थर मृत्तिकेचा आहे. त्याचे खालीं

मुरूम त्याचे खालीं काळा खडक असे अनेक पापद्रे अनुक्र मानें आहेत खेरीज अनेक प्रकारचीं रत्नें व अनेक प्रकारच्या धातू पृथ्वींत आहेत. हा गोल तयार होण्यास बहुत घालमेली झाल्या असतील यांत संशय नाहीं. वेदामध्यें असें सांगितलें आहे कीं पाण्यापासून पृथ्वी झाली. ही गोष्ट सयुक्त आहे प्र थम पाणी असून त्याजवर एक थर बसला असेल नंतर दु सरे पदार्थ जीव व तरू होऊन ते मरून दुसरा थर बसला असे ल असे अनेक थर या पृथ्वीस हल्लीं उघड दिसत आहेत ते जा हाले असतील व कितीएक ठिकाणीं त्या काळचीं जनावरें हो तीं त्यांचे सांगाडे विलक्षण तऱ्हे तऱ्हेचे पृथ्वींत खोल खंटलें अस तां सांपडतात. याजवरून दर एक वेळ पृथ्वीवर कशी सृष्टि झाली व तीलयास कशी गेली व त्यास काळ किती लागला याचा अं त नाहीं. परंतु पुराणावरून असें सिद्ध आहे कीं सर्व पदार्थ नि र्माण करून पृथ्वी तयार झाल्यावर मनुष्यांस निर्माण केलां आ णि हा प्राणी पाहून ईश्वर फार संतोष पावला. मनुष्य उत्पन्न होऊन राहूं लागल्यापासून पृथ्वीवरच्या घालमेली बंद होऊन स्व स्थता जाहाली असें दिसतें.

प्रथम मनुष्यें उत्पन्न केलीं तेंव्हां त्यांस कोणता प्रदेश दिल्हा. व त्या काळीं त्यांची कशी स्थिति होती याविषयीं अज्ञानच आहे परंतु अनुमान असें आहे कीं पहिल्यानें मनुष्यें उत्पन्न होतांच फ ळें व मूळें भक्षण करून राहात असतील. नंतर त्यांस जों जों कळ

लागले तसतसें अन्न शिजवणें व शेतकी करणें इत्यादि कुश लता करूं लागले. पहिल्यानें मनुष्यानी वस्ती केल्याचा पत्ता अ सा आहे कीं हिंदुस्थानींत उत्तरप्रांती आर्यवर्त ह्मणून नाव ज्या प्रदेशांचें आहे तेथें राहिले. मग जसजसें वाढत चालले तसतसें ग्राम, नगरें, लेखन वाचन, इत्यादि अनुक्रमानें फरिते झाले.

पुराणाचें संमत असें आहे कीं प्रथम पुरुष निर्माण केला. तो ब्रह्मदेव व प्रथम स्त्री विरूपा त्याची पत्नी या दंपत्यापा सून प्रजेचा विस्तार झाला नंतर प्रजेचे रक्षणार्थ श्रीविष्णूनें राज्य केलें तोच प्रथम राजा जाहला. पहिल्यानें लोक ध्यानेंकरून ईश्वर भजन करीत होते नंतर तपेंकरून दानें करून करूं लागले याप्रमा णें काळेंकरून पापाच्या निर्बंधनार्थ आचार विचार वाढले. पूर्वी धर्म वेदाप्रमाणें होता नंतर शास्त्रें ऋषीनी केलीं नंतर पुराणें झालीं.

मनुष्यास स्वर्ग नरक प्रपंच अशा तीन स्थिति आहेत व या जगास ईश्वर आपले शक्तीनें चालवीत आहे. उत्पत्ति, स्थि ति लय करणार तो च आहे ह्मणून प्रभू परमेश्वर अशीं त्यास नावें झालीं. अशी त्याचीं अनेक नावें जसा जसा प्रगट होऊन साधू चे रक्षणादिक कार्ये केलीं तसतशीं त्यांस लोकांनी विशेषणें दिल्हीं आहेत.

उत्पत्ति नंतर मनुष्यें ईश्वर प्रसादानें प्रथम भाषा बोलूं लागले. ती संस्कृत होय. ती कितीएक कालपर्यंत चालली. नंतर

ती जाउन प्राकृत भाषा अनेक झाल्या. अशखीं पुराणावरून असें दिसतें कीं जे प्रथम आर्यवर्तांत लोक राहत होते त्यांच्या च्यार जाती होत्या. त्यांतून कांहीं कनिष्ट जाती त्या देशांतून निघून अन्यप्रदेशीं गेल्या त्याणी स्वतंत्र राष्ट्रं तिकडे वशिवलीं व पाणी हवा उष्ण शीत भेदें करून ते लोक वेगळाले दिसूं लागले व वेगळाल्या भाषा बोलूं लागले. परंतु आर्यावर्तांतील लोकांनीं त्या काळीं विद्येचा व कळा कौशल्याचा फार प्रयत्न केला त्या प्रमाणें इतर देशचे लोकांनीं केला नाहीं. याजमुळें आर्यावर्तांतील संस्कृत भाषा बोलणारे लोक इतर देशचे लोकांस म्लेंछ ह्मणूं लागले कारण कीं त्याणी ती भाषा सोडून अन्य भाषा तिचा अपभ्रंश जाहलेल्या बोलूं लागले. व आर्यावर्तांतील लोकांचे आचारही त्यांणी टाकिले.

हिंदुस्थानांतील राजे याणीं सर्व म्लेंछास जिंकून कर भार घेतले आहेत व ते म्लेंछलोकही आपल्यास नीच मानून आर्यावर्ताचे राज्यास मानीत. आर्य ह्मणजे हिंदुलोकांचा प्रदेश पहिल्यानें थोडा होता नंतर जे राजे जाहाले त्यांणी महान् महान् अरण्यें तोडून प्रजेची संस्थापना केलीत गेले. पहिल्यानें अशी चाल होती कीं दर एक ग्रामास ग्रामाधिपती ह्मणजे पाटील असे. त्याजवर पांच पंचवीस ग्रामास एक देशमुख देशाधिकारी असे. त्याजवर राजा आणि असे कितीएक राज्यावर एक महाराज चक्रवर्ती असे. या धाकटे राज्यांची राज्यें लहान असत. परंतु प्रजेस पाळणाविषयीं

दक्ष असत. पहिले राजे शास्त्रानें फार प्रतिबंधित असत व रयतेस मोकळीक फार असे. कारण कीं पाटील व देशमुख हे प्रजेचे तर्फेचे वकील राजाजवळ जाऊन वसुलाचा वगैरे ठराव करीत प्रत्येक ग्राम स्वतंत्र राज्यच असे. नंतर ग्रामाधिकार वगैरे कुळांत परंपरेनें होऊंलागले. व राजास अधिकार कुळपरंपरेनें प्राप्त होऊं लागले तेव्हांपासून राजे व अधिकारी अगदीं बिघडून अशास्त्र प्रवृत्ति झाली.

पुराणांत काळाची गणना सांगीतली आहे ती येणेंप्रमाणें

| | | |
|---|---|---|
| मनुष्यांच्या अहोरात्रि ३० | महिना १ | महिना १ |
| महिने ........ | १२ = | वर्ष १ |
| वर्षे ........ | १७२८००० = | कृतयुग |
| वर्षे ........ | १२९६००० = | त्रेतयुग |
| वर्षे ........ | ८६४००० = | द्वापार |
| वर्षे ........ | ४३२००० = | कलियुग |

हे मनुष्यांचें मान झालें अशीं दिव्य सौरमान वगैरे अनेक अधिक अधिकच आहेत. हिंदुलोकांचे मतें काळ अनादि आहे यास्तव हे त्याचे विभाग केले आहेत. परंतु हें फक्त गणिताचे उपयोगी इतिहासाचे उपयोगी नाहींत.

युगें ४ = चौकडी १

चौकड्या = १००० किंवा मनु अथवा मन्वंतरें १४ } ब्रह्मदिवस किंवा कल्प एक } १

अशीं ब्रह्म्याचीं वर्षे भरतील तेव्हां विष्णूची एक घटिका याप्रमाणें पुष्क ळ मोठी गणना आहे. शेवटीं कितीही झालें तरी ईश्वराजवळ अटकतें त्यास काळाचा भेद नाहीं तो सर्वदा अनाद्यंत, अविनाशि, सनातन, सारखा आहे.

हिंदुलोक हल्लीं असें मानितात कीं. ब्रह्मदेवाचीं पन्नास वर्षे जाऊन एकावन्नावे वर्षाचे पहिले दिवसाचा दुसरा प्रहर चालला आहे. त्यांत सातवा मनु वैवस्वत चालला आहे. व श्वेतवाराहचौथा कल्प आहे व सत्तावीस चोकड्या जाऊन अठ्ठाविसावीचे चौथें कलियुग चालले आहे. त्याचीं वर्षे ४९५० गेलीं परंतु पुराण संमत असें आहे कीं दरएक चौकडींत मागल्याप्रमाणें इतिहास होतो यास्तव इतिहासांत इतक्या काळगणनेनें फरक पडत नाहीं. एकंदर चौकडींत विष्णूचे अवतार दाहापैकी नउगत झाले त्यांणी वारंवार साधूचें रक्षण केलें व दाहवा पुढें होणार आहे तेव्हां मागील तीन युगाचा इतिहास पुराणांत असा लिहिला आहे कीं कृतयुगीं दैत्यराजे झाले व पुढें दोन युगीं दोन वंश प्रसिद्ध आहेत त्यांतील राजे झाले एक सूर्यराजाचा वंश व दुसरा सोमराजाचा वंश त्याचा तपशील वदरएकाचा इतिहास पुराणांत आहे. येथें नावें मात्र घेतलीं आहेत.

कृतयुग. यांत विष्णूचे अवतार ४

१ मछ    २ कूर्म    ३ वराह    ४ नृसिंह

दैत्यराजे १९

१ कृतवीर्य    २ कार्तवीर्य    ३ दशपर्व    ४ विकृति    ५ मुचुकुंद

६ भैरव    ७ अंधकासुर    ८ उग्रसेन    ९ हिरण्याक्ष    १० हिरण्यकश्यप

११ प्रऱ्हाद १२ विरोचन १३ बळि १४ बाणासुर १५ मणि मल्ल १६ सगर १७ दिल्लीप १८ कपिल्ल १९ कपिनाथ.

त्रेतायुग.

यांत विष्णूचे अवतार ३

१ वामन २ परशुराम ३ श्रीरामदाशरथि

सूर्यवंशीराजे ४२

१ सूर्य २ वैवस्वत ३ इक्ष्वाकु ४ पृथु ५ उत्तानपाद ६ ध्रुवराज ७ द्युमत्सेन ८ मांधाता ९ मुचुकुंद १० हरिश्चंद्र. ११ रुक्मांगद १२ धर्मांगद १३ अंबऋषी १४ सगर १५ भगीरथ १६ ककुत्स्थ १७ दिलीप १८ रघु १९ अज २० दशरथ २१ राम २२ कुश २३ अतिथि २४ निष्टंध २५ नीलनैषध २६ अहिनग २७ दमभिदान २८ शील २९ तुनाथ. ३० पद्मनाथ ३१ हिरण्यनाथ ३२ वैद्रन्यनाथ ३३ हरिदश्व ३४ कौशल्य ३५ सुबळि ३६ ब्रह्मिष्ट ३७ पुष्करनेत्र ३८ पुष्कर ३९ ध्रुपद ४० सुदर्शन ४१ मृगायताक्षी ४२ अग्रीयण.

द्वापारयुग.

यांत विष्णूचा अवतार १

श्रीकृष्ण.

व राजे सोमवंशी १५

१ सोम २ बुध ३ नरबुध ४ पुरूरवा ५ नळ ६ नरहंस. ७ धीमंत ८ शतानीक ९ सत्राजित १० नरवंद ११ शांतनु

१२ चित्र १३ विचित्र १४ पंडु १५ युधिष्ठिर.

युगांची वर्षे संख्या फार आणि राजे थोडे असें वाटेल परंतु त्याकाळीं आयुष्यें फार मोगालीं होतीं. त्याकाळीं भाषा संस्कृत होती वरती राजे लिहिले आहेत ते चक्रवर्ती समजावे. त्याखेरीज मांडलीक राजे अनेक होते. सूर्यवंशाची राजधानी अयोध्या व सोमवंशाची राजधानी प्रयाग. नंतर हस्तनापुर होतें मुख्यवंश चंद्र, पुरु, यदु, हे झाले. व त्या काळीं दिवसें दिवस अंमल वाढत चालला. रामाच्या वेळेस जीं अरण्यें होतीं तीं पांडवाचे वेळेस नाहींशीं होऊन त्या ठिकाणी मनुष्यें राहूं लागलीं. असें पुराणावरून सिद्ध होत आहे. व द्वापाराचे अंतीं म्लेंछ व यवन हिंदुस्थानांत संचार करूं लागले होते. परंतु त्या वेळेस राजे महापराक्रमी होते, त्याणी येऊं दिल्हे नाहींत त्या काळीं इकडील लोकांत या देशचें नाव भरतखंड असें प्रसिद्ध होतें. व उत्तर प्रांतास आर्यावर्त, पुण्यभूमी, देवभूमी, किंवा ब्रह्मवर्त असें ह्मणत होते. क्षत्रिय राजाचा अंमल हिंदुस्थानचे दक्षिणप्रांतीं बसण्यापूर्वी रानांत व डोंगरांत लंकादिक बेटांकडून लोक येऊन राहिले त्यांचे वंशज हल्लीचे भील व कोळी वगैरे लोक असतील असें वाटतें.

सदरहू तीन युगांत हिंदू लोक मोठे पराक्रमी सर्व पृथ्वींत त्यांचे राष्ट्र मोटें होतें. त्याकाळीं विद्याही पुष्कळ वाढली. परंतु पुराणांत बहुधा असे लेख आहेत कीं, " ही गोष्ट अम

ध्यानें अमच्यास संवाद रूपानें सांगीतली. ती येथें लिहिली आहे" त्याजवरून लेखनविद्या द्वापारांनच झाली असावी असें दिसतें पूर्वीचे युगीं ऋषी वगैरे तोंडानें पढवीत असा पत्ता लागतो याजवरून पुढें पुस्तकें झाली असावी व्यास ज्याकाळीं झाले त्याकाळाचे सुमारें विद्येचा तर फारच भर असेल व त्याकाळीं या लोकांनी सर्व पृथ्वी जिंकिली असेल असें वाटतें. कारण कीं हिंदुलोकांच्या चाली व संस्कृत शब्द वगैरे खुणा सर्व राष्ट्राचे इतिहासांत आटळतात. प्राचीन काळचे इतर देशचे लोक यांचा धर्म हिंदुलोकासारखा होता असें सिद्ध आहे. सिंधूनदी पलिकडे न जाण्याचा शास्त्रार्थ आलीकडे जाहला असावा. त्या युगीं नसेल अशीं अनुमानें प्राचीन लेखावरून होतात. अशा अनेक गोष्टी आहेत परंतु सर्व पुराणांतील वगैरे लेख एकत्र करून इत्यर्थ ठरविला असतां पक्का इतिहास कदाचित काढतां येईल. परंतु हें काम सोपें नाहीं.

## कलियुग.

### भाग २

### शालीवाहनाचे पूर्वीचा इतिहास.

### कलियुगाचे १ले वर्षापासून ३१७९ वर्षें पर्यंत.

पुराणाचें संमत असें आहे कीं कलियुगाचीं वर्षें ४३२००० आहेत. त्यांत अवतार २ पहिला बोद्ध, दुसरा कल्की, व साहा शककर्ते लिहिले आहेत ते येणें प्रमाणें.

युधिष्ठिर, विक्रम, शालिवाहन, विजयाभिनंदन,
३०४४ १३५ १८००० १०००००

नागार्जुन, कलंकी,
३००००० १०८२१

या पैकीं दोन पहिले शककर्ते यांचे वर्षसंख्येंत हिंदुस्थानांत काय झालें त्याचा विचार या भागांत करावयाचा आहे.

या काळीं मुख्य एक गोष्ट अशी आहे कीं सरासरी कलियुगाचीं हजार वर्षे गेल्यानंतर बौद्ध अवतार झाला तो गयेस येऊन तेथें नवीन वेदबाह्य धर्म स्थापूं लागला. त्यास कितीएकानीं मान्य केलें तें मत ब्रह्मदेश व थीबेटदेश व चीनदेश व लंका वगैरे ठिकाणीं चालू झालें. परंतु हिंदुस्थानचे कितीएक ब्राह्मणानी मान्य केलें नाहीं. तो तट बहुत वर्षे पर्यंत चालला. त्या मताचें शेवटीं खंडण श्रीशंकराचार्य अजमासें शालीवाहनाचे पूर्वी दोनशें वर्षे उत्पन्न झाले त्याणीं केलें.

हस्तनापुरी सोमवंशी राजे ३० झाले नंतर त्यांचे प्रधान परंपरा राज्यें जाहलीं त्या दरएकाचे इतिहास कांहीं सांपडत नाहीं त नावेंमात्र सांपडतात. तीं येथें उतरून घेतलीं आहेत.

प्रथम शककर्ता युधिष्ठिर याचे वंशांत राज्य होतें त्याकाळीं हिंदुस्थानांत फार सुबत्ता व ऐश्वर्य व पराक्रम व मोठे मोठे विद्वान होते. युधिष्ठिर राजा याचे वंशांत हस्तनापुरी राजे झाले ते
१ राजा युधिष्ठिर याणें कलियुगांत प्रथम वर्षापासून ३२ वर्षे

आठ महिनें पंचवीस दिवस राज्य केलें या राजाची कीर्ति बहुत आहे व रामराजाचे आलीकडे रयतेस सुख या राज्यांत झालें. हा राजा व त्याचे चार बंधु मिळून पांच पांडव यांचे व त्याचे भाऊ बंद यांचे राज्याचे हिशाकरितां तुंबल युद्ध होऊन सर्व राज्य पांडवांनी मिळविलें त्याचा इतिहास भारत ग्रंथ वेदव्यासस्वामिनी कविता लिहिली आहे त्यांत संपूर्ण तपशीलवार लिहिला आहे

| | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | ३२ | ८ | २५ |

२ परीक्षिती राजा याणें ही उत्तम प्रकारें राज्य केलें व त्याचा अंत असा लिहिला आहे कीं एक ब्राह्मणानें त्यास शाप दिल्हा तेणेंकरून तो सर्प दंश होऊन मरण पावला. त्यास अंतकाळींश्री शुकस्वामी व्यासपुत्र यांहीं श्रीमत् भागवत सांगितलें त्याणें राज्य साठ वर्षे एक महिना केलें

| | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | ६० | १ | ० |

३ जन्मेजय राजा याणें आपले बापाचे मरणाचा सूड उगवावयाम्हणून बहुत सर्प जाळिले व राज्य करून मोठी कीर्ति मिळविली त्याणें राज्य किती दिवस केलें ती संख्या

| | व० | म० | दि० |
|---|---|---|---|
| | ८४ | ५ | २७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ अश्वमेध · · · · · · · · · · | व० | म० | दि० |
| | ८२ | ८ | २४ |
| ५ राजाधर्म · · · · · · · · · · | व० | म० | दि० |
| | ८८ | २ | ८ |

| | वर्षे. | महिने. | दिवस. |
|---|---|---|---|
| ६ मनजीत. | ८१ | ११ | २४ |
| ७ भूरथ. | ७५ | ८ | ८ |
| ८ दीपपाळ. | ७५ | १० | १८ |
| ९ उग्रसेन. | ७७ | ७ | २४ |
| १० सूरसेन. | ७९ | ८ | ६ |
| ११ भूपति. | ६१ | ५ | २ |
| १२ रणजीत. | ६५ | १० | १५ |
| १३ वीरजित. | ६४ | ७ | ९ |
| १४ भीमसेन. | ६५ | ८ | २९ |
| १५ सुकलालदेव. | ६२ | ० | ३ |
| १६ नरहरिदेव. | ६१ | १० | ४ |
| १७ सुनीतारथ. | ७२ | ११ | ३ |
| १८ राजाशूर. | ५८ | ० | ८ |
| १९ परवत. | ५० | ८ | २० |
| २० मधुकरदास. | ५२ | ४ | ७ |
| २१ तोरणमल्ल. | ४८ | १० | २९ |
| २२ भीष्मदेव. | ४७ | १० | २९ |
| २३ नरहरिरथ. | ४७ | ११ | ० |
| २४ पूर्णमल्ल. | ४४ | ८ | १७ |
| २५ सागरदेव. | ५६ | ० | ० |

| | वर्षें. | महिने. | दिवस. |
|---|---|---|---|
| २६ रूप. | ५४ | १० | २ |
| २७ अभिमन्य. | ५१ | १३ | ८ |
| २८ धनपाल. | ४८ | ७ | ४ |
| २० गजाभीम. | ५८ | ५ | १५ |
| ३० लखुमीदेव. | ३८ | ११ | २१ |
| | १८३५ | २१४ | ३९८ |

वर्षें १८५३ यांस आठ रोज कमी.

सदरहू लखमीदेव यास त्याचा वजीर वीरसेन याणें मारून राज्य संपादलें त्याचे वंशजानीं राज्य केलें तें.

| | वर्षें. | महिने. | दिवस. |
|---|---|---|---|
| १ वीरसेन. | १७ | ७ | ० |
| २ शूरसेन. | ३२ | ८ | ११ |
| ३ वीरखांभ. | ३७ | ८ | २२ |
| ४ अनंतखांभ. | ३२ | १० | ७ |
| ५ हरिरूप. | ३५ | ९ | १७ |
| ६ सुलोचन. | ४३ | १ | ४ |
| ७ परत. | ४२ | ९ | २४ |
| ८ उरुपाळ. | ३८ | २ | ५ |
| ९ चुवाद | ३५ | ४ | २४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० पृथ्वीपाळ | ३१ | ८ | ११ |
| | ३४२ | ६६ | १२६ |

वर्षे ३४७ ९ ६

पृथ्वीपाळाचा वजीर हरिनाथ याणें त्यास मारून राज्य केलें तें बितपशील.

| | वर्षे. | महिने. | दिवस. |
|---|---|---|---|
| १ हरिनाथ. | १५ | १० | १८ |
| २ जयतशिंग. | २७ | ७ | १६ |
| ३ बहरीगमत. | २१ | २ | १३ |
| ४ दीपपाळ. | ३५ | ४ | ७ |
| ५ महाबाहु. | ३५ | ८ | १ |
| ६ अमीरपाळ. | २८ | ८ | १० |
| ७ जयतपाळ. | २८ | ११ | १० |
| ८ माणिकचंद. | २९ | ७ | २१ |
| ९ कामचंद. | ३२ | ५ | १० |
| १० हरिगोण. | १७ | ० | ११ |
| ११ जीवनगोण. | २३ | ९ | २७ |
| १२ रिजवंग. | १३ | ७ | २९ |
| १३ उदितकंठ. | ३५ | २ | २० |
| १४ भरवाळ. | २३ | ११ | २४ |
| १५ भूपति. | १० | २ | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ त्रिविक्रम. | १० | २ | १० |
| | ३८१ | ९५ | २४० |
| | ४०५ - | ४ - | १६ |

त्रिविक्रमाचा मंत्री उदितकंठ याणें त्यास मारून आपण राज्य केलें तें बितपशील.

| | वर्षे. | महिने. | दिवस. |
|---|---|---|---|
| १ उदितकंठ. | २४ | २ | ० |
| २ चंद्रपाळ. | १६ | ९ | २४ |
| ३ सुंदरपाळ. | २१ | ४ | १८ |
| ४ दंशापाळ. | १९ | १ | ११ |
| ५ रसिकपाळ. | १८ | ० | १२ |
| ६ अनंतपाळ. | १८ | ० | १२ |
| ७ रामपाळ. | ३२ | ११ | १२ |
| ८ गोविंदपाळ. | २८ | ७ | २७ |
| ९ राजाभीमपाळ. | १६ | १० | १३ |
| १० अमृतपाळ. | १६ | ७ | १९ |
| ११ बाळपाळ. | १२ | ५ | २७ |
| १२ भूपाळ. | १४ | ९ | २२ |
| १३ हरिपाळ. | १३ | ८ | ४ |
| १४ मदनपाळ. | १७ | ७ | १९ |
| १५ कर्मपाळ. | १५ | २ | २५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ विक्रमपाळ | १९ | ११ | १२ |
| | ३०३ | १०३ | २५८ |
| | ३१२ | ३ | १८ |

विक्रमपाळाचा पराभव अधीर याणें केला आणि आप
ण राज्य केलें तें बितपशील.

| | वर्षे. | महिने. | दिवस. |
|---|---|---|---|
| १ अधीर | २४ | ० | १० |
| २ मूळचंद | १४ | १ | ४ |
| ३ विक्रमचंद | ११ | २ | ० |
| ४ रूपचंद | १५ | ० | ० |
| ५ मल्लराज | १२ | २ | ४ |
| ६ सूरचंद | २१ | ० | १० |
| | ११७ | ५ | २८ |
| | ३०४४ | | |

नंतर उज्जनीस विक्रम झाला त्याणें नवीन शक चालू केला व शक लोकांनी स्वारी हिंदुस्थानावर केली त्यांचा पराजय केला ह्मणून त्यास शककर्ता ह्मणतात. परंतु दिल्लीची राजधानी त्याकाळीं होती तेथें खालीं लिहिलेले राजे यांणीं राज्य केलें.

| | | | |
|---|---|---|---|
| १ सुउचंद | १४ | ९ | १४ |
| २ भीमचंद | १२ | ३ | १ |
| ३ गोविंदचंद | २१ | ७ | १२ |

| | | वर्षे. | महिने. | दिवस. |
|---|---|---|---|---|
| ४ | भावनीराजा. | १ | ० | ० |
| ५ | त्रिमळ. | ७ | ५ | १९ |
| ६ | गोविंद. | २० | २ | ० |
| ७ | पूर्णप्रेम. | ७ | ७ | १९ |
| ८ | महानद. | १३ | ७ | १८ |
| | | ९९ | ४० | ८३ |
| ९ | जेशिंग बंगालचा याणे महानंदाचा पराभव करून राज्य केलें. | | | |
| १० | मळिराज. | १४ | ० | ३ |
| | | ३२ | ५ | ७ |
| | | १३५ | | |

युधिष्ठिर व विक्रम या दोन शककर्त्यांच्या अमलामध्यें पूर्वी संस्कृत भाषा सर्वलोक हिंदुस्थानांत बोलतहोते ती नष्ट होऊन पोथ्या पुराणें इत्यादिक मात्र त्या भाषेंत राहिलीं व त्या भाषेचा अपभ्रंश होउन दाहा भाषा उत्पन्न झाल्या तत्रापि ब्राह्मणलोक संस्कृत भाषा चांगली व त्यांत सर्व ग्रंथ ह्मणून पढून शिकूं लागले त्या दाहा भाषेंचीं नावें व देश व त्याची प्राचीन व अर्वाचीन नावें येणें प्रमाणें.

| प्राचीन. | अर्वाचीन. | भाषा. |
| --- | --- | --- |
| १ सरस्वती. | सुभा पंजाब. | प्राकृत. |
| २ कनोज. | सुभा दिल्ली. | हिंदी. |
| ३ तीरुत. | अजमेर. | मिथिल. |
| ४ गौड. | बंगाला. | गौड. |
| ५ गुर्जरदेश. | गुजराथ. | गुजराथी. |
| ६ उडकल. | उडसाप्रांत. | उडया. |
| ७ महाराष्ट्र. | दक्षण. | मराठी. |
| ८ तैलंग. | तैलंगण. | तैलंगी. |
| ९ कर्नाटक. | कानडा. | कानडी. |
| १० द्रविड. | द्रविड. | तामुल. |

या काळीं पंडितानीं कितीएक ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिले त्यांस काव्यें व महात्म्यें व तंत्रें अशीं नावें आहेत परंतु हे सर्व अर्वाचीन आहेत. या काळचे अंतीं ह्मणजे विक्रमशकाचे अंती हिंदुलोकांस क्षीणता येतचालली. व राजे दुष्ट निघूं लागले. ब्राह्मणानी विद्या वाढविण्याचा मार्ग सोडला व पंडीत शास्त्री यांणी खुषामतीचा स्वभाव धरिला. त्याजमुळें त्यांची वंचना होऊंलागली. पूर्वी स्वकर्मरत ऋषीवर्यादि होते तेव्हां ब्राह्मणाचा मान होता तो गेला तत्रापि कितीएक राजे भोजासारखे विद्येस फार द्रव्यादिक मदत करून वाढविणारे व कालिदासासारखे देशोदेशीं विद्वान् झाले. व शंकराचार्य स्वामीनी धर्म सु

धारणा व स्थापना केली याप्रमाणें या काळचा वृत्तांत आहे.

त्या काळीं परदेशचे लोक यवनादि बलाढ्य व शाहाणे होऊं लागले व ते इकडे येत होते असें दिसण्याचें कारण यवनाचें सर्व ज्योतिष ब्राह्मणांनी रमलसुद्धां संस्कृत भाषेंत लिहून घेतलें आहे व रोमकपट्टन ह्मणजे रुमशाहर त्यामधें इकडे प्रसिद्ध होतें परंतु त्याचा वृत्तांत पक्का माहीत नवता जसें हल्लीं जुन्या लोकांस लंडन व इग्लंड माहीत आहे तद्वत असेल असें वाटतें.

परदेशचे इतिहास पाहातां त्यांत हिंदुस्थानाविषयीं लेख आटळतात ते येणेप्रमाणें.

१ दारा इराणचा बादशाहा होता तो शालिवाहनाचे पूर्वी ५९८ वर्षे इकडे आला होता तो कांहीं देशास उपद्रव देऊन गेला.

२ सिकंदर यावनदेशचा राजा तो शालिवाहनाचे पूर्वी ३९८ वर्षें हिंदुस्थानांत येऊन त्याणें सिंधुनदी पर्यंत अंमल बसविला तो मुलूख त्याजकडे राहिला त्याचे पुढें गादीवर बसलेल्यांणीं ते राज्य कांहीं दिवस केलें. शिकंदराला अडवा पोरस राजा त्या वेळेस होता तो गेला. त्यांचें युद्ध होऊन पराभव झाला अशा गोष्टी व त्या वेळचे इकडील लोकांचें वर्णन यावनदेशचे वृत्तांतांत लिहिले आहे.

३ पुढें एक शेलुकस ह्मणून राजा होता तो यवन होता

परंतु त्याची मुलगी एक हिंदुराजाला स्त्री केली होती व त्याः हिंदुराजाचे येथें यवनराजाचा वकील होता ह्मणून समजतें.

---

### भाग ३

### शालिवाहनाचे पश्चात्‌चा इतिहास.

### हिंदुराजे.

दक्षिणेंत प्रतिष्ठान ह्मणजे हल्लीचें पैठण या गांवींच्या एके मनुष्यानें पराक्रम करून राज्य स्थापिलें व आपला शक चालू केला. त्या काळीं दिल्लीस राजे राज्य करीत होते त्यांचीं नावें.

१ शूरसेन २ माधवसेन ३ देवसेन ४ भूसेन ५ कल्याणसेन ६ हरिसेन ७ ब्रह्मसेन ८ नारायणसेन ९ लक्ष्मीसेन १० दामोदरसेन.

दामोदरसेनास माधवसेन याणें जिंकून राज्य करूं लागला (शालिवाहन शके १०४.

१ माधवसिंग २ दिवसिंग ३ राजसिंग. ४ शेरसिंग ५ हरिसिंग ६ नरहरसिंग.

यासमारून राजा धीरधीर राज्य करूं लागला. (शके १९

१ धीरधीर २ सेन ३ मलजी ४ महानुज ५ हरिनाथ ६ जीवन ७ उदयसिंग ८ गुलाबचंद ९ विक्रमचंद.

यास जिंकून पृथ्वीपाळ राज्य करूं लागला (शके ४१९)

१ पृथ्वीपाळ २ उजनपाळ ३ उदपाळ ४ चैनपाळ. यांस अजमीरचे राजानी जिंकून राज्य केलें ८ शके ५०० तो वंश येणेप्रमाणें.

१ अनळ २ संमतदेव ३ महादेव ४ अजय ५ वीरसिंह ६ विदसर ७ वैरी ८ मानिकराय ९ महासिंग १० चंद्रगुप्त ११ प्रतापसिंह १२ महानूसिंह १३ सीताराय १४ नागयस्त १५ लोहधर १६ वीरसिंह १७ विबुधसिंह १८ चंद्रार्य १९ हरिहरराय २० वसंतराय. २१ हलिंगराय २२ प्रथमराय २३ अंगराय २४ विशालराय २५ सारंगदेव २६ अन्नदेव २७ जयसिंग २८ अनंददेव २९ सोमेश्वर. ३० पृथ्वीराय.

याणें राज्य ११०० शकांत केलें तेव्हां त्यास मोगलानी जिंकून राज्य घेतलें.

त्याकाळीं हिंदुस्थानांत लाहान लाहान राजे फार होते त्यापैकीं एक गुजराथेंत स्वतंत्र राज्य होतें — मागधदेश ह्मणजे बंगाला तिकडे जरासंधाचे वंशांतील राजे राज्य करीत होते त्यांची राजधानी पठणा ह्मणून हल्लीं शहर आहे. त्याचे जवळ पडलेली आहे त्या नगरास पातलीपत्र किंवा कुसुमानगर ह्मणत होते. उज्जनीजवळ अवंतीह्मणून शहर होतें तेथें एक वंश राज्य करीत होता. मार्यवंशाचे ह्मणून कांहीं राजे झाले. आंद्रवंशाचे कांहीं राजे झाले. कांहीं कनोज येथें. कांहीं उदेपुरास कांहीं जेपुरास कांहीं उडसाप्रांतीं गजतिल ह्मणून राजे झाले कांहीं बिजानगरास व कांहीं जोतपुरास झाले असें आणखी किती

एक असनील परंतु त्याविषयीं कांहीं इतिहास लेख वगैरेकां हीं सांपडत नाहीं फक्त जुने बखरींत नावें मात्र आटळता त. त्याच प्रमाणें वर लिहिलेले हस्तनापुरचे राजे यांची व्यव स्था आहे. हस्तनापूर दिल्लीजवळ पहिलें शहर होतें.

मोगल लोक हिंदुस्थानांत प्रथम आले ते शके ९०० परंतु त्यांचा अंमल एकदाच बसला नाहीं. त्यांणीं दिल्लीस आपली राजधानी स्थापली तरी कितीएक वर्षे पर्यंत मांडलि क राजे मोडण्यास लागले यास्तव आतां पुढें मुसलमानांची हकीकत लिहितों.

या शालिवाहनाच्या ९०० वर्षांत हिंदुलोक अगदीं अ विद्वान् व आळशी झाले त्या विषयीं लार्डनर साहेबाचे इतिहा सांतून कांहीं ओळी उतरून घेतों.

(पृष्ठ १०) "हिंदुस्थानांतील लोकांजवळ वास्तवीक इतिहास नाहीं परदेशचे लोक आले त्यांणी कांहीं लिहिला ति तकाच हिंदुलोकांच्या चाली अतिशय जुनाट आहेत याजवरून हा देश बहुत काळापासून वसलेला असावा परंतु धर्मसंबंधीं का यदे व जातिनिर्बंधामुळें या देशांतील लोकांची बुद्धि वाढलीनाहीं यास प्रमाण सिकंदरानें दोन हजार वर्षांपूर्वी या लोकांचें वर्णन के लें आहे. तसेंच हे लोक हल्ली आहेत या देशांत लोक पुष्कळ व उत्पत्ति पुष्कळ आहे. विद्या चाली पुरती आहे. देशाभिमान तर कोणासच नाहीं. मागून पाहिलें तर या देशावर जो उठला तोस्वा

री करून सहज जिंकून राज्य करूं लागला. परंतु आलीकडे मुसलमानानी पक्का अंमल बसविला व सर्व देशहीहिमालया पासून दक्षिण समुद्रतीरापर्यंत हस्तगत केला. तात्पर्य हिंदुस्थानचे लोकानी देशाभिमानें करून स्वराज्य आपले आपण संभाळून असावें. परंतु हें त्यांचे प्रालब्धींच दिसत नाही. सर्वकाळया देशांतील कोण्हावर्धा लोकानीं परदेशांतील लोकांच्या छञ्या खाव्या हेंच त्यांचे कपाळीं आहे. बुद्धि व विद्या वाढविण्याम वउद्योग करण्यास व विचार करण्यास जे लोक धर्मामुळें किंवा शास्त्रामुळें किंवा स्वभावामुळें जे लोक असतात त्यांची अशीच अवस्था होते हें या देशांतील अवस्था पाहून सर्व लोकांनी शिकावें आणि शाहणें व्हावें."

## मुसलमानीराज्य.

हिंदुस्थानचे वायव्य दिशेस गजनीची राजधानी मोठी जाहली अलप्तेगीन म्हणून एक बुखारा येथील राज्याचा सरदार होता तो जातीचा तुर्क होता त्याणें गजनीची राजधानी स्वतंत्र केली नंतर त्याचा सरदार सबक्तेगीन तो राज्य करूं लागला नंतर तो मेला. आणि त्याचा पुत्र महंमदगजनवी शके ९१९साली राज्यावर बसला.

त्याणें इराणचा मुलूख कांहीं काबीज करून हिंदुस्थान घेण्याचा बेत केला. आणि स्वारी केली जेव्हां इकडे मुसलमान सैन्य घेउन आले तेव्हां हिंदुराजे आडवे आले त्यांचा पराभव करून मुस

लमानानी देवळें वगैरे पाडून लूट करून परत गेले अशा त्या
णें स्वाऱ्या केल्या. एका स्वारींत त्याणे मथुरेस येऊन देवळें
सर्व पाडून सोन्यारुप्याचे देव सांपडले ते नेले.व सोमनाथा
चें शिवलिंग फोडून तुकडे करून गजनीस मशीदीचे उंब
ऱ्याखालीं लावले ह्मणजे मुसलमानाचे पायांखालीं टाकले
असें त्याणें बहुत उछेद केले.

नंतर महंमद मेला. त्याचे पुढें कोणी हिंदुस्थानांत
आला नाहीं. परंतु शके ११०३त महंमदघोरी गजनीचा मु
लमान ह्मणजे राजा जाहला त्याणें पुनः हिंदुस्थानांत येण्या
चा बेत केला.

यासमयीं अजमेर व दिल्ली येथें अंमल पृथ्वीरायया
चा होता जयदेव कनोज येथें राज्य करीत होता.व भीमदेव गु
जराथेंत होता.

महंमदघोरी हिंदुस्थानांत स्वारी करून आला त्याचा
प्रथमतः शके १११४ सालीं पृथ्वीराय याणें पराभव केला.
नंतर पुढेंले सालीं (१११५त) दुसऱ्यानें महंमद आला त्या
ची लढाई मोठी सरस्वती तीरीं झाली तेथें हिंदूचा पराभव मु
सलमानानी केला पृथ्वीरायास धरून मारला व त्याचा मुल
गा चावंद्रराय लढाईंत मेला.नंतर शके १११७त पुनःस्वा
री मुसलमानानी केली तेव्हां कनोजचा जयदेवराजा यास
मारला.

याप्रमाणें मुसलमानानी पहिल्यानें अंमल बसविला. महंमदानें आपला सरदार कुतुबदीन होता त्यास जिंकिलेल्या मुलुखावर अंमल करण्यास सांगितलें तो दिल्लीस राहिला.

तो मेल्यावर त्याचा मुलगा अराम गादीवर बसला त्यास एक वर्ष झालें नाहीं तों गजनीहून एक सरदार अलतमष् या नावाचा येऊन त्यास मारून राज्य करूं लागला. त्याणें बंगाला व बाहार व माळवा काबीज केला तो शके ११५८ सालीं मेला. याणें उज्जनी घेतली तेव्हां महाकाळज्योतिलिंग फोडून दिल्लीस मशीदीचे उमऱ्याखालीं पुरलें.

याकाळीं गजनीचे राज्याचा दिल्ली हा सुभा होता. अलतमष् मेल्यावर ५० वर्षेपर्यंत राज्य त्याचे वंशानें केलें परंतु शके १२१०त जलालुदीन याणें तो वंश बंद करून राज्य करूं लागला.

जलालुदिनास त्याचे पुतण्यानें मारला आणि राज्य करूं लागला त्याचें नाव अल्लाउदीन् याणें गुजराथ काबीज केली चितूरचा किल्ला घेतला व तेलिंगण व मलबार येथें स्वाऱ्या केल्या त्यावेळेस ९६००० हजार मण सोनें लुटून आणिलें व जवाहीराच्या पेट्या कितीएक आणल्या. मुसलमानांस लुटीमध्यें पैसा पुष्कळ सांपडेल ह्मणून ते लूट आणण्याकरितांच स्वाऱ्या करीत — आलाउदीन् फार दुष्ट होता परंतु विद्या वृद्धि करणारा होता त्याकाळीं हिंदुस्थानी कवी — मीरखुसरु — ख्वाजेहुसेन —

वगैरे ज्यांची कवितेंत हाल्लीं प्रसिद्धी आहेत तसले कवी पुष्क ळ झाले.

अलाउद्दीन मेल्यावर त्याचे मुलगे याणीं कांहीं काळपर्यं त अमल केला नंतर गेयुदीनतोघलग् या नावाचा लाहूरचा सु भेदार होता तो येऊन राज्य करूं लागला. (शके १२४२) हा जा तीचा तुर्क होता.

गेसुदिन शके १२४७ त मेला त्याचा मुलगा महंमद तोघलग् राज्यावर झाला. तो फार दुष्ट होता त्याणें शिक्का खो टा पाडला व धारे चढविले जुलूम फार केला. दिल्ली सोडून रा जधानी दौलताबादेस केली. तेथें बळेंच लोकांस नेलें असा जु लूम २७ वर्षे झाला त्याणें एकवेळ फौजे सहित शिकारीस ह्मणून गेला आणि हजारों माणसें मारून टाकिलीं त्याचे अं मलांत दक्षणेंत विजापूरचा सुभेदार स्वतंत्र राजा झाला. व बं गालचा सुभेदार स्वतंत्र राजा झाला.

महंमद मेल्यावर फिरोज झाला (शके १२७४) त्या णें ३७ वर्षे अंमल चांगला करून शके १३११ त मरण पावला.

नंतर थोडीशी घालमेल झाली त्यांत चार राजे झाले. परंतु त्यांचे अंमलांत गुजराथ व माळवा येथें जे सुभेदार हो ते ते वेगळे होऊन दिल्लीचे बादशाहास मानीतनासे झाले. आप ल्यास ते सुलतान ह्मणऊं लागले. गंगेचे पूर्वेस जैनपुरास खा

जाहान याणें स्वतंत्र राज्य स्थापिलें व दिल्लीस महंमद होता.

या काळीं तैमुर्लिंग याणें हिंदुस्थानांत स्वारी केली व दिल्ली घेतली. नंतर महंमद पळून गेला. तैमुर्लिंगानें कैदी एक लाख धरले तितके मारून टाकिले व दिल्लींत असताना मोटी कतल केली तों तैमुर्लिंग गेल्यावर पुनः महंमद आला तो वीस वर्षे राज्य करून मरण पावला. नंतर त्याचे वंशज राज्यावर झाले त्यांत शेवटला अल्लाहुसेन १३६९ शकांत झाला त्याणें सर्व मुलुख गमावला. सर्व सरदार व सुभेदार मुलूख बळकाऊन बसले. दक्षण माळवा, बंगाला, गुजराथ, येथील नवाब वेगळे झाले. शेवटीं भिल्लाल्खानलोदी दिल्लीस राज्य करूंलागला.

पुढें त्याचा मुलगा शिकंदरशाहा लोदी याणें आग्र्यास राजधानी केली. पुढें त्याचा वंशज इब्राहीम हा राज्य करीत असतां तैमुरयाच्या वंशांतील बेबर याणें स्वारी केली. त्यांची लढाई पाणपतास होऊन इब्राहिमाचा पराभव होऊन दिल्लीचें राज्य बेबराने घेतलें. (शाके १४४८)

हुमायुं हा बेबराचा मुलगा १४५८ साली राज्यावर झाला. परंतु त्याचे भावानी दंगा केला. व शेरखान याणें हुमायुस पळउन इराणांत लावला नंतर आपण आपले वंशज यांणी मिळोन १९ वर्षे राज्य केले नंतर हुमायु परत येउन त्यांचा पराभव करून पुनः

आपण दिल्लीचे गादीवर बसला (शके १४९७) परंतु पुढचे सालींच माडीवरून पडून मेला.

नंतर आकबर दिल्लीस राज्यावर झाला. तो मोठा कीर्तिवान होता व त्याणें जे सुभे बदलले होते ते सर्व आपले ताब्यांत आणले. आकबरानें मुसलमान लोक फार दंगेखोर ह्मणून बहुतेक कामावर हिंदुलोक ठेविले. व हिंदुराजांशीं सोयरिका केल्या. त्याणें राज्याचे बंदोबस्ताकरितां कायदा केला. व मुलखाची वाटणी करून त्याजवर अधिकारी नेमले. तोडरमल्लयाजकडून मतबंदी केली. त्याचे प्रधान आबुफजल व बिरबल फार शाहाणे होते. त्याणी विद्याही फार वाढिवली. व पंडीत ठेऊन वेदशास्त्रें व भारतादिकांचे तरजमे फारशींत केले त्याचा अंमल चांगला होता.

आकबर शके १५२७त मेला. नंतर त्याचा मुलगा शिलीम हा जाहांगीर असा किताब घेऊन तक्तावर बसला. त्याचे अमलांत त्याचेच मुलानी दंगे केले तो शके १५५० साली मेला.

नंतर शाहाजीहान त्याचा मुलगा राज्यावर बसला त्यास त्याचे मुलानें राज्यावरून काढून आपण राज्य करूं लागला. आणि बापास कैदेंत ठेविलें. त्या मुलाचें नाव औरंगजब शके १५८१ त औरंगजबाचे भाऊ, दारा, व मुराद, हे राज्यावर दावा करीत होते परंतु त्यांस मारून टाकले. औरंगजबयाणें पुढें अलमगीर असें नाव घेतलें.

औरंगजबानें गोवळकोंड व विजापूर हीं राज्यें बुडविलीं व त्याचे अंमलांत मराठीलोकांत शिवाजी उद्भवला. औरंगजबानें ४८ वर्षे राज्य केलें आणि शके १६२९ साली मेला याचे पुढें त्याचा मुलगा महंमद माजिम याणें आपले दोन भाऊ मारून टाकले आणि राज्यावर बसला आणि आपल्यास बाहादरषाह ह्मणऊं लागला. त्याणें ४ वर्षे राज्य केलें त्याचे अंमलांत नानकषाहा ह्मणून पंजाबांत एक हिंदु होता त्याणें नवीन धर्मपंथ स्थापिला त्यापंथांतील लोक शीक ह्मणवितात त्याणी दंगे केले त्यांशीं लढाया झाल्या.

त्याचें पुढें त्याचे ४ मुलगे होते त्याणीं आपसांत लढायाकरून शेवटीं वडील मुलगा ज्याहादरषाह राज्यावर बसला त्यास दीड वर्ष झालें तों त्याचे पुतण्यानें त्यास काढून आपण राज्य करूं लागला त्याचें नांव फरोखषेर.

फरोखषेरास साहावर्षांनी त्याचे कारभारी सैयद ह्मणून दोन होते त्याणी काढून टाकला. आणि औरंगजबाचा नातू रफीउदरजात यास बसविला तो कांहीं दिवस होता नंतर मेला पुढें बाहादरषाहाचा नातू महंमदषाह यास राज्यावर बसविला. (शके १६४०)

दिलीस ही गर्दी झाली त्यांत निजामुलमुलूख हैदराबादवाला व लखनोचा नबाब हे वगैरे राज्यें बळकाऊन बसले आणि बादषाहास जुमानीतनाहीसे जाहाले व मराठे यांणीं दंगा केला.

महंमदषाह याचे वेळेस नादरषाह इराणाहून दिलीवर आला त्याणें लूट फार केली व दिल्लींत कितीएक लोक मारले नंतर बाद

षाहापासून खंडणींत काबूल व मुलतान आपलेकडे घेऊन इराणास गेला.

महंमदषाह शके १६६९ साली मेला नंतर अहंमदषाह त्याचा मुलगा राज्यावर बसला त्याचे डोळे घाजीउदीन याणें फोडून राज्यावरून काढला आणि बाहादरषाहचा नातू यास राज्यावर बसविला त्याचें नाव अलमगीरसानी ह्मणून दुसरें ठेविलें.

याचे अमलांत दिल्लीचें राज्य बहुत करून संपलें. काबूलास अबदल्ली राजा झाला. सादत्तअली लखनौचा राजा झाला. अलीबर्दिखानानें बंगाला घेतला. निजामानें दक्षिण आटपली. बाकीचा मुलुख मराठ्यानी दाबला.

अलमगीरसानीस त्याचा वजीर गासीउदीन याणें मारला. आणि षाहाजिहान हा त्याचा भाऊबंद होता. त्यास राज्यावर बसविला. परंतु अलमगिराचा मुलगा याणें त्यास काढून आपण राज्य करूं लागला. त्याचें नाव षादअलम् (शके १६८३)

याचे राज्यांत मराठे सरदार सदाशिवपंत भाऊ व विश्वासराव दिल्लीवर आले आणि गासीउदीनास हाकून दिल्हा. नंतर ते पाणपतावर अबदल्ली काबूलचा राजा याशी लढायास गेले परंतु पराभव पावले. (शके १६८३)

नंतर षाहाअलम याचा द्वेषी गुलाम कादर रोहिला

हा केवळ पशूहून नीच होता याणें आपली सरशीकरून बादषाहास हस्तगत केला. व त्याचे मुलाबाळांसुद्धां कैदेंत ठेविला. व त्याणें बादषाहाची अशी दुर्दशा केली कीं त्याचे मुलांस व बायकांस त्याचे देखत मारी व कितीएक बाया अन्नावांचून मारल्या शेवटीं त्याचे डोळे त्या दुष्टानें कटारीनें फोडून टाकले असे अनर्थ केले तें साल शके १७१० नंतर महादजी शिंदे दिल्लीवर गेले त्याणी गुलामकादरास मारून बादषाहाची संस्थापना आंधळा होता तशीच केली शके १७११ सालीं व पेशवे यांचें नावें मुतालिकीचीं वस्त्रें घेतलीं आणि आपले नावें वजीरीचीं वस्त्रें घेतलीं मग दिल्लीचा बंदोबस्त करून बादषाहास कायम केला नंतर पुढें दिल्ली शिंद्यापासून इंग्रेजानी शके १७२५ सालीं घेतलीं आणि शाह अमलास पेनशिन दिल्हें त्याचा वंश हल्लीं दिल्लीस आहे.

याप्रमाणें मुसलमानाचें राज्य संपलें. मोगलानी सरासरी ८०० वर्षे हिंदुस्थानांत राज्य केलें तितक्या काळांत हिंदूच्या चाली रीति भाषा सर्व उलटी केली. व कायदे नवीन केले. राज्याची रीति त्याची अशी असे कीं सर्व मुलुखाचे सुभे केले होते त्याजवर एकेक सुभेदार असे. फौजदारीचा व दिवाणीचा व फौजेचा हे सर्व अमल त्याजकडे असत. वसूल त्याणेंच करून रसद सरकारांत पाठवावी परंतु

दंगे व अन्याय फार त्या काळीं होते. हिंदु लोकांमध्यें पूर्वी स्त्रियां स पुरुष मान फार देत होते. यास प्रमाण रामचंद्रा जवळसी ता सिंहासनावर दरबारांत बसत असे. अशी कथा आहे. तशीच पांडवांची चाल होती परंतु त्या चाली हल्लीं हिंदुलो कांमध्यें धर्मसंबंधी कृत्यें आहेत. त्यांत मात्र स्त्रियांचा मान दृष्टीस पडतो. ह्मणजे अक्षतेंत बायका पुढें चालतात. पु ण्याहवाचनाचे वेळेस वगैरे सर्वलोकांदेखत भ्रताराजवळ स्त्रिया बसतात परंतु मुसलमानाचे राज्यांत त्यांची बायका लपविण्याची व बायकांचा अपमान करण्याची चाल हिंदुलो कानी घेतली. अशा कितीएक गैरचाली घेतल्या. तात्पर्य हिंदुस्थानास किमपि फायदा मुसलमानाचे राज्यापासून जा हाला नाहीं असें दिसतें.

---

## मराठे.

### सातारचें राज्य.

दिल्लीचें राज्य आठपण्याचे संधीस मराठे लोकांनीं जीव धरून पुनः हिंदुराज्याची स्वदेशांत स्थापना व्हावी ह्मणून उद्योग केला. आणि त्याणी बहुतेक मुलूख काबीज केला ते लोक पूर्वीचे रानटी अवस्थेंत असून अकस्मात राज्य कारभारां त पडले तो कारभार त्याणी थोडे दिवस निभावला. आणि रा ज्य प्राप्त होतांच ते सुखास लंपट होऊन स्थिरावले आणि नवीन

गूण मिळवण्याचे एकीकडे राहून मूळचे रानटी अवस्थें तील जे शौर्यादिक गुण होते तेही टाकले. आणि सत्वर राज्य भ्रष्ट झालें. यालोकांची विद्वत्ते विषयीं व ज्ञानाविषयीं प्रख्याति नाहीं व त्याणी आपले राज्यांत त्याविषयीं उद्योग ही केला नाहीं. फक्त लिहावयास आलें ह्मणजे. उत्तम प्रतीचा शाहपणा व शिपाई व सरदार होळकरासारखे राज्य करणारे यांस देखील लिहितां येतच नव्हतें — अस्तु त्याणी राज्य मिळविळें त्याचा इतिहास अल्प येथें लिहितों.

दौलताबादेजवळ वेरुळ गांव आहे. तेथील राहणार मराठा माल्लोजी ह्मणून होता त्याचा मुलगा शाहाजी होता हे दोघे विजापूरचे मुसलमान राजाचे चाकर व त्यांजकडे चाकरी बद्दल पुणें व सुपें हीं जाहागीर होतीं. शाहाजीस पुत्र शिवाजी शके १५४९ साली झाला. त्याचे लहानपणापासून असें मनांत आलें कीं मुसलमानाचें राज्य बुडवून हिंदुराज्य स्थापन करावें या हेतूनें तो कधीं दंगे करीव किल्ले घेई व लूट करून पैसा आणी त्याजवर विजापुराहून फौज आली तिचा दैवयोगानें त्याणें पराभव केला असें होतां होतां बराच मुलूख शिवाजीनें आपलेकडे घेतला नंतर शके १५८६ त आपल्यास राजा ह्मणऊं लागला व शिवराई पैसा पाडला पुढें शके १५९६ सालीं हिंदूशास्त्राप्रमाणें राज्याभिषेक

झाला. अष्टप्रधान केले. त्यासमयीं ५०००० फौज त्याची जमली व करनाटकपर्यंत अमल बसला मुळीं पाहिलें तर याणें मावळचे कुळंबी जमा करून दंगा केला परंतु त्याकाळीं दिल्लीचें राज्य बुडत होतें व मुसलमान लोक सुस्त झाले होते ह्मणून त्याचे बेत सिद्धीस गेले पुढें शाके १६०२ साली शिवाजी मेला.

शिवाजीचा मुलगा संभाजी होता तो फार दुष्ट होता. तो राज्यावर बसतांच आपला सापल भाऊ राजाराम याच्या मातुश्रीस ठार मारली व जुने चाकर दूर केले शेवटीं औरंगजब बादषाहानें तुळापूर मुकामी संभाजीस शाके १६११ सालीं ठार मारला आणि त्याचा मुलगा शाहू व बायको यांस धरून कैदेंत ठेविलें.

तेव्हां मराठ्यानी संभाजीचा सापत्न भाऊ राजाराम यास राज्यावर बसविला तो शाके १६२२ सालीं मेला नंतर त्याची बायको ताराबाई इणें आपला पुत्र शिवाजी यास सिंहासनारूढ केला आणि राज्य चालविलें.

इतक्यांत शाके १६३० सालीं शाहू राजा औरंगजबाचे कैदेंतून मोकळा होऊन साताऱ्यास येऊन गादीवर बसला आणि ताराबाई व शिवाजी तिचा मुलगा यास कोलापुरास इलाखा तोडून दिल्हा. बाळाजी विश्वनाथ हे मुख्यपणे कारभार करीत असत. शाहूने ४२ वर्षे राज्य केलें आणि शाके १६७१ सालीं मरण पावला.

शाहूस संतान नव्हतें सबब रामराजा दत्तक दिल्हा. तो शके १६९१ साली मेला. परंतु त्याचे हातीं कांहीं राज्य न व्हतें. शाहूचे मागें पेशवे याणी राज्य बळकावलें आणि राजास उगीच टिक्याचा धनी मात्र करून ठेवीत. रामराजास एक मुलगा दत्तक दिल्हा त्याचें नाव शाहू महाराज तो शके १७३० सालीं मेला. नंतर त्याचा मुलगा प्रतापसिंह गादीवर होता त्यास इंग्रेजानी पेशव्यांचे राज्य घेतल्यानंतर कैदेंतून मोकळा करून शके १७४० साली लहानसे राज्यावर स्थापिला. परंतु त्याणें इंग्रेजसरकाराशी बिघाड केला ह्मणून शके १७६२ साली गादीवरून काढून सताभाऊ शाहाजीस बसविला तो शके १७७१ सालीं मेला त्यास वंशनाहीं ह्मणून इंग्रेजानी राज्य खालसा केलें.

---

# पेशवे.

## पुण्याची गादी.

पूर्वी शाहूजवळ बाळाजी विश्वनाथ होते ह्मणून सांगितलें त्याणी ६ वर्षे कारभार करून शके १६४२ सालीं सासवड मुक्कामी मरण पावले.

त्यांस दोन मुलगे होते एक बाजीराव व दुसरा चिमणाजी आपा त्यापैकीं वडिलास पेशवाईचीं वस्त्रें झालीं त्याणीं बडोद्याजवळ दाभाड्यांचा पराभव केला व दोन वेळ निजामास जिंकला. व करनाटकांत स्वारी करून खंडणी घेतली व चौथाई व सरदेशमु

खी अंमल हिंदुस्थानांत बसविला त्याचे वेळेस च्यार सरदार होते ते पुढें फारच वाढले. १ मल्हारराव होळकर. २ राणोजी शिंदे. ३ पिलाजी गाईकवाड. ४ परसोजी भोंसले. याणी मोठाले पराक्रम केले. फिरंगी याणीं मुंबईस गणें घातलें होतें तें बाजीरावानें काढून देऊन मुंबई घेतली नंतर शाके १६६२ सालीं मरण पावले.

बाजीरावास दोन मुलगे एक बाळाजी बाजीराव व रघुनाथराव पैकीं वडील बाळाजीराव यांस पेशवाई झाली त्याचा चुलत भाऊ सदाशिव चिमणाजी याणें पराक्रम फार केले त्याकाळीं पुणें ही राजधानी झाली. सदाशिवपंत भाऊ व विश्वासराव बल्लाळ याणी शाके १६८३ सालीं पाणपतची स्वारी केली ते तेथेंच लढाईत पडले. त्याजमुळें मराठीलोकांस व राज्यास फार धक्का बसला. तत्रापि मराठ्यांचा अंमल दिल्ली अग्र्यापर्यंत बसला होता व शिंदे व नागपूरवाले याणी अंमल फार बसविला. बाळाजीराव यास नानासाहेब ह्मणत त्याणी इंग्रेज कांहीं उपयोगी पडतील ह्मणून त्यांस बाणकोट व ९ गांव दिल्हे व व्यापार करण्याची सनदही दिल्ही. पाणपतचें वर्तमान ऐकून नानासाहेब लोकरच मरण पावले (शाके १६८३)

माधवराव बाळाजीपंत नानाचे पुत्र राज्यावर बसले त्याणी ११ वर्षे राज्य केलें हा पुरुष मोठा पराक्रमी शूर ब्राह्मण असे. २८ वर्षांचे वयांत शाके १६९४ सालीं मरण पावले त्यांचे अमलांत मराठे राजांची जमा शिंदे होळकर वगैरे सुद्धां दाहा कोट रुपये होती.

त्यांचे पाठीमागें त्यांचे बंधू नारायणराव गादीवर बसले त्यास आठ महिन्यानी त्याचे चुलत्यानें ह्मणजे रघुनाथराव याणी मारले. त्याची बायको तेव्हां गरोदर होती तिला पुत्र माधवराव झाला तों पर्यंत रघुनाथराव याचा दंगा होता व कारभारी राज्य कारभार चालवीत होते.

माधवराव याचें नावें राज्य शके १६९६ पासून चालू झालें. रघुनाथराव इंग्रेजांस मिळून राहिला व त्यांची फौज लढाईस मदत आणिली. त्या घालमेलींत इंग्रेजानी साष्टी घेतली नंतर रघुनाथराव शके १७०६ सालीं मरण पावला त्यास बाजीराव व चिमणाजी अपा व अमृतराव हे तीन मुलगे होते.

माधवराव याचे कारकीर्दींत नाना फडणीस सर्व कारभार करीत होते. पुढें महादजी शिंदे वारले त्याचे गादीवर त्याचा मुलगा दौलतराव झाला. मराठ्यांनी इंग्रेजांचा पराभव वडगांवावर केला व खर्डे येथें निजामाचा पराभव केला. परंतु टिपू सुलतान करनाटकांत बलाढ्य झाला. पुढें माधवराव शके १७१७ सालीं मरण पावले.

पुढें बाजीराव शके १७१८ सालीं गादीवर बसला नाना फडणीस त्याचा द्वेषी ह्मणून त्याणें शिंद्या कडून त्यास कैदेंत घातला नंतर शके १७२२ सालीं तो मरण पावला. नाना सारखा शाहणा मराठी राज्यांत कोणी नव्हता. बाजीरावानें जुने सरदार सर्व मोडून टाकले व शिंदे होळकरांशीं द्वेष केले त्याणींही

पुढें लूट व दंगे केले ह्मणून बाजीराव पळून इंग्रजांच्या पाठी शीं पडला. शके १७२४ सालीं वसईचा तहनामा झाला पुढें शके १७३९ सालीं गंगाधरशास्त्री यास बाजीरावानें मारविला व इंग्रेजांशीं बिघाड करून लढाई विनाकारण केली त्यांत पराभव पाऊन पळून गेला (शके १७४०) तेव्हां इंग्रेजानी पेनसीन देऊन ब्रह्मावर्तीस राहावयास जागा दिल्ही तेथें तो शके १७७२त मरण पावला. बाजीराव याचे अंमलांत राज्याची दुर्दशा फार झाली व हलके लोक त्याणें फार जमा केले व तो स्वतां महान् दुष्ट बुद्दीचा होता ह्मणून सर्व लोक त्यास ब्राह्मणखेरीज करून त्रासले. ब्राह्मणासमात्र तो पैसा पुष्कळ वाटी ह्मणून ते त्याची स्तुति करीत. परंतु बाजीरावाची गणना दुष्टराजांत आहे.

याप्रमाणें मराठी राज्याचा शेवट झाला. या राज्यांत मराठे लोक जे पूर्वी रानटी होते ते उदयास येऊन राज्य करूं लागले व मराठे व ब्राह्मण पुष्कळ श्रीमंत झाले. परंतु चिरकाळ राहण्याजोगा देशास कांही लाभ झाला नाहीं. मुख्य उपयोगी विद्या अगदी वाढली नाही. व विचार वाढला नाहीं विद्या ह्मणून इतकीच वाढली कीं वेद पाठ करणारे व शास्त्रपाठ करणारे हे पुष्कळ झाले. त्यांत वैदिक फारच झाले. वैदिकांचा मानही फार होता व त्यांस पैसा पुष्कळ देत वैदीक नाहीं असें घर नव्हतें मुसलमानाचे अंमलांत हे लोक अगदींच खचले होते व वैदिक किंवा पंडित सोधून आणावा लागे. लिहिणारा तर दोनच्यार

गांव मिळून एक सांपडे. ती अवस्था गेली हें खरें परंतु कळा कौशल्य किंवा विचार किंवा नवीन ग्रंथ हे कांहीं झाले नाहींत कारण कीं विद्या ह्मणजे काय तें या लोकांस कळतच नाहीं.

---

## इंग्रजीराज्य.

### कलकत्याची गादी.

हिंदुस्थानापासून सातहजार कोस पश्चिम दिशेस एक द्वीप आहे त्याचें नाव ब्रिटन् व तेथील लोकांस ब्रिटीश ह्मणतात या द्वीपाचे दक्षिणभागीं इंग्लंड अशी संज्ञा आहे व त्या भागांतील लोकांस इंग्लिश किंवा इंग्रज ह्मणतात या द्वीपाचे रायीं लोकांनीं विद्या वृद्धीचा बहूत प्रयत्न करून विचार व विद्या दोन-च्यारशें वर्षांत फारच वाढविली.

सदरहू देशांतील कांहीं सावकार याणीं शके १५२२ सालीं व्यापार वाढविण्याच्या उद्देशानें सरकारास अर्जी केली कीं आह्मी पदरचा पैसा खर्च करून हिंदुस्थानांत व्यापारास्तव जातों. त्यास पंधरा वर्षेपर्यंत दुसरे कोणी सावकारानें तिकडे जाण्याचा प्रयत्न करूं नये त्याजवरून तेथील सरकारची सनद त्या प्रमाणें झाली. नंतर दोन च्यारशें सावकारानीं ह्मणजे कंपणीनें पाती करून तारवें रवाना केलीं त्याणीं इकडे येऊन दाहा पांच वर्षें उद्योग करून सुरत, अमदाबाद, कांभोज, येथें दुकानें

घालून विलायती माल आणून उदीम करीत जावा ह्मणून दिल्ली च्या बादषाहाची परवानगी घेतली नंतर शाके १५६२ सालीं चीना पट्टन उर्फ मद्रासेस दुकान राजाचे परवानगीनें घातलें शाके १५९० सालीं मुंबई पूर्तकाली लोकांपासून घेतली. व शाके १६२० तकल कत्ता व गोविंदपूर येथील जमीदारी विकत घेऊन बादषाहाचा फर्मान घेतला नंतर शाके १६३९ सालीं सदतीस महालची जमीदारी घेतली आणि फलत्याचा किल्ला बांधून त्याचें नाव फोर्टविलीयम् ठेविलें.

त्या काळीं दंगे लूट सांड फार होत होती देशांत नेहेमी लढाया व तंटे होत असत. सबब मोटे व्यापारी यांस शिपाई वगैरेचें दोबस्त ठेवावा लागे. ह्मणून कंपणीनें जमीदारी व किल्ला व फोज वगैरे केले असें नसतें तरी त्यांची गरज नव्हती.

पुढें निजाम व कर्नाटकचा नवाब यांचे मध्यें लढाई उत्पन्न झाली तेव्हां इंग्रेजानीं निजामास मदत्त केली त्या वेळेस यश आलें तेव्हां कांही मुलूख मद्रासेकडे मिळाला.

शाके १६७८ सालीं कलकत्यास सुराजदौला याणें किल्ल्यावर हल्ला केला आणि १४६ इंग्रेज लोकांस लहान खोलींत कोंडून कोंडून ठेविलें तेव्हां तेथें ते दम कोंडून मेले. हें वर्तमान मद्रासेस पोहोंचतांच कर्णेल क्लाईव साहेब फौज घेऊन कलकत्यास आला आणि सुराजदौल्याचे शत्रू कोणी होते त्यास मदतीस घेऊन चाल केली तेव्हां तो पळाला तो पलाशी येथें राहिला. तेथें इंग्रे

जाशीं लढाई होऊन पराभव पावला. त्याची फौज गैर काय दा रानटी होती ती जरीं पन्नास हजार होती तरी दोन तीन पलटणानी पळविली. नंतर मीरजाफर यास नवाब इंग्रेजानी करून बसविला. पुढें तो करारा प्रमाणें इंग्रेजांस पैसा देईना सबब त्यास काढून काशीमअली यास बसविला त्याणें ही बिघाड केला तेव्हां त्यास काढून पुनः मीरजाफरास बसविला. तेव्हां काशीम याचा पक्ष दिल्लीचे बादषाहानें धरला तेव्हां त्याशीं बिघाड होऊन लखनौ व प्रयागपर्यंत इंग्रेजानीं ठाणी घातलीं बादषाहाचा उपाय चालेना तेव्हां इंग्रेजास लढाईचा खर्च देऊन सल्ला केला. व बंगाला व बहार व उडसा हे तीन सुभे दिल्हे. व जो मुलूख पूर्वी कंपणी कडे होता त्याज बद्दल फर्मान करून दिल्हा. शके १६८७ या सालापासून कंपणीस सरकार अशी पदवी झाली.

सावकारांची मंडळी उर्फ कंपणी यांस एवढी पदवी हिंदुस्थानांत मिळाली. हें वर्तमान इंग्लंडांत समजल्यावर तेथील पार्लिमेंट ह्मणजे राजसभा याणी बंदोबस्त शके १६९५ सालीं असा केला कीं कंपणीचे अमलांत राजाचे तर्फेचें एक कोडत असावें व कंपणीनें कागदपत्र राजाचे प्रधानास दाखवावे व कंपणीने गवरनरजनराल नेमणें तो राजाचे विद्यमाने नेमावा.

याप्रमाणें बेत ठरून प्रथम गवरनरजनराल कलकत्यास वारंन् हेस्टिंग नेमला. त्याणें शिंदे व होळकर यांशीं लढाया करून त्यांस जेर केले. नंतर पुण्यास रसिदंन्ट मालिट साहेब नेमला. व हैदरआलीस जेर केला व काशी घेतली.

या गवरनरजनराल साहेबावर विलायतेंत गैरशिस्त कामें केल्याची व जुलूम केल्याची फिर्याद पडली त्याचा इनसाफ होऊन तो सात वर्षांनी सुटला. लोकसत्तात्मक राज्य ज्या देशांत आहे तेथें थोराची अवस्था अवस्था होते.

शके १७०८ सालीं लार्ड कार्नवालिस् गवरनरजनराल दुसरा नेमला. त्याणें टिपूशी लढाई करून श्रीरंगपटणपर्यंत आला परंतु तह केला. व इंग्रेजी राज्याचे कायदे त्याणें बसविले.

नंतर शके १७१३ सालीं सरजान शोर गवरनरजनराल झाला तो पांच वर्षे होता नंतर शके १७१८ सालीं मार्कस् वसली साहेब नेमला. त्याणें श्रीरंगपटण घेऊन टिपूस मोडला. व एक पूर्वीच्या हिंदुराजाचा वंशिक तेथें बसविला. तो मुलूख इंग्रजांस पुष्कळ मिळाला. नंतर लखनौचा नवाब व निजाम यास फौज मदतीस देण्याचे करार करून पुष्कळ अणखी मुलूख दक्षणेंत व हिंदुस्थानांत घेतला शिवाय मराठे लोक इंग्रजांवर उठले तेव्हां शिंदे, होळकर, भोंसले, इत्यादिकांचें पारिपत्य लार्डलेक व जनराल वसली साहेबानें केलें व दिल्ली व आग्रा घेऊन गुज

राथ ही काबीज केली.

शके १७२७ सालीं लार्ड कार्नवालिस् यास पुनः गवरनर जनराल नेमला त्यानंतर सरज्यार्ज बार्लो कांहीं दिवस होता.

नंतर शके १७२९ सालीं लार्ड मिन्टो आला त्याणे फराशिसांचा मोड करून हिंदुस्थानचे नजीक बेटांतून त्यांचीं ठाणीं होतीं ती उठवून दिल्हीं.

शके १७३५ सालीं मार्किस् अफहेस्टिंगज् यास गवरनर जनराल नेमला. त्याचे अंमलांत नेपाळचीं लढाई झाली व पेंढारी अगदीं मोडून नाहींसे केले. पुणें घेऊन पेशव्यांस हाकून दिल्हे. व त्याप्रमाणें नागपूरासही झालें. व होळकराचा मोड झाला नंतर सातारचे राजास सातायाचे आसपासचा कांहीं मुलूख देऊन स्थापिला. बाकी सर्व खालसा अंमल केला. रजपूत लोकांचा बंदोबस्त करून त्यांस ताब्यांत घेतले. याचे अंमलांत कंपणीसरकारचा म्हणजे ब्रिटीशलोकांचा अमल हिंदुस्थानांत सर्व बसला.

शके १७४५ सालीं लार्ड आमर्ष्ट आला त्याचे अमलांत ब्रह्मदेशांत लढाई झाली त्यांत त्या लोकांचा पराभव होऊन इंग्रेजास कांहीं मुलूख त्याणी दिल्हा व भरतपूर घेतलें.

शके १७४९ सालीं लार्ड बेंटींक गवरनरजनराल आला त्याणें एक इकडील लोकांवर मोठा उपकार केला आहे कीं सतीजाण्याची अतिशय दुष्ट चाल जेणेंकरून यादेशाची निंदा सर्व भूमंडळावर झाली आहे ती चाल बंद केली. बायजा बाईचा दंगा ग्वालेरीस

झाला त्याचा ठराव केला. अजमीरचे राजे रजवाड्यांचे तहनामे पुनः केले. मैसुरचें राज्य घेतलें शींधचे अमीर व रंजितशिंग सीख यांसीं ठराव केला कीं इराणाकडून युरोपखंडांत जाण्यास मधून रस्ता करावयाच्या उद्योगास साहाय करावें. गंगेवर आगबोटी चालू केल्या. व लोकांमध्यें विद्यावृद्धि होण्याच्या तजविजी केल्या याचे अंमलांत कंपणीची सनद नवीन होऊन कंपणीस व्यापारी ह्मणत होते तें नांव काढून टाकलें.

नंतर शके १७५७ सालीं तो लार्डसाहेब जाऊन त्याचे कामावर सरच्यार्लस मेटकाफ झाला त्याणें प्रथमच छापखान्या बद्दल कायदा करून छापणारे यांस मोकळीक दिल्ही. नंतर शके १७५८ सालीं लार्ड आकलंड आला.

त्याचे अंमलांत लखनौ येथें दंगा झाला तो मोडला गुमसुर घेतलें व काबूलखंदारवाले लोक युरोपखंडांत जाण्याचे रस्त्यास हरकत करूं लागले व इंग्रेजांशीं शत्रुत्व करूं लागले ह्मणून त्यांशीं लढाई सुरु झाली. ही लढाई मोठी झाली व फोज फार खराब झाली व पैका पुष्कळ व्यर्थ गेला. लाखों माणूस मेलें शेवटीं काबूल हस्तगत होऊन पुनः दंगा होऊन गेलें. ज्या शाहासुजाचा पक्ष धरला होता तो मारला गेला. तेव्हां निराश होऊन लढाई सोडली. साताऱ्याचा राजा काढला.

शके १७६४ सालीं लार्ड एलंबरो यास गवरनर जनराल नेमला त्याणें काबूलची लढाई अगदीं टाकली. सिंधचा मुलूख

ख घेतला. ग्वालेरचा बंदोबस्त करून मराठ्यांचा पराभव केला व मुलूख कांहीं घेतला त्यानंतर त्याचे कामावर शके १७६६सा लीं लार्ड हारडिंज आला.

लार्ड हार्डिंज साहेब याचे अंमलांत शिकांशीं लढाई होऊ न राज्य घेऊन पुनरपि परत दिल्हें.

नंतर शके १७६९ अखेरीस मार्कीस डालहौसी गवरनर जनराल झाले ते हल्लीं कामावर आहेत.

यांचे अंमलांत शिखांचे मुलखांत दंगा होऊन कंपणीस रकारचे राज्यावर त्याणीं चाल केली. त्याजमुळें गवरनरजनरा ल यांस फौज जमा करून स्वराज्याचें रक्षण करणें जरूर पडलें लढाई मोठी झाली. त्यांत शिकांचा पराभव झाला. परंतु शीक लोक वारंवार उपसर्ग करून आपले राज्यांत दंगा करीत व रा जाचे कारभाऱ्यांस नमानीत व राज्यावर लहान मूल व कार- भारी वाईट मसलत देणार व त्यांस एकवेळ राज्य परत दिलें असतां त्याणीं उपकार न जाणून कंपणी सरकारावर हल्ला के ला यास्तव गवरनर जनराल साहेबानीं राज्य खालसा करून ते थें इंग्रेजी अंमल बसऊन सुरळीत पणानें राज्य चालवावें असा ठराव करून त्याप्रमाणें तें राज्य घेतलें.

सातारचा राजा नष्ट संतति होऊन मरण पावला. त्याणें द त्तक घेतला तो सरकारानें कबूल केला नाहीं सबब तो मुलूख घे तला.

# इंग्रजीराज्याची रीति.

कंपणी सरकारचे राज्यकरणारे वेगळे आहेत व त्यांजवर नजर ठेवणारे वेगळे आहेत.

नजरठेवणारे यांत मुख्य इंग्लंडांतील पार्लिमेंट २ बोर्डआफ कंत्रोल्ल ह्मणजे इंग्लंडांतील राजाचे प्रधान सर्व बसतात ती सभा ३ कोर्ट आफ् प्रोप्राइटर्स ह्मणजे ज्या ज्या लोकानी हिःसा देऊन भांडवल जमियलें व नफ्यांत पाती ठेविली त्या सर्व लोकांस प्रोप्राइटर ह्मणजे मालक ह्मणतात. ते नवाहून अधिक बसले ह्मणजे कोर्ट होतेंतें. एकूण तीन नजर ठेवणारे अधिकारी आहेत.

राज्यकरणारे अधिकारी यांस मुख्य कोर्ट आफडेरेक्टर्स ह्मणजे प्रोप्राइटरलोकां पैकीं वर्षास चोवीस असामीस पगार देऊन काम करण्यास नेमतात. व त्यांचे हाताखालीं कामदार पुष्कळ आहेत. ही सभा सर्व काम चालविते व हुकूम करिते व हिंदुस्थानांत सर्व नेमणुका देणें घेणें वगैरे सर्व ते करितात.

कोर्ट आफडेरेक्टर्स यांचे हाता खालीं एक गवरनर जनराल आफ् इंन्डिया हा अंमलदार व त्यास मसलत देणारे कोन्सलदार हे कलकत्यास आहेत ते सर्व हिंदुस्थानांत कायदे करितात व हुकूम करितात.

गवरनर जनराल याचे खालीं दरएक इलाख्याचे ह्मणजे मुंबई मद्रास आग्रा एथील गवरनर व त्याप्रमाणेंच दरएक हि-

काणचे कमांडर चीफ आहेत.

दरएक गवरनराचे तीन मसलत देणारे असतात ते सर्व एकेजागीं बसतात. त्या सभेचें नांव कौन्सल.

कौन्सलच्या हाताखालीं मुलुखाच्या बंदोबस्ताकरितां जज्य व व कलकटर व फौज असते.

इकडील लोकांत कोणी सुशिक्षित व भला व निर्मळपणानें काम करणारा व विश्वासु नाहीं ह्मणून जितकें मोठे योग्यतेचें व पगाराचें काम तितकें सर्व इंग्रज लोक कुळीण इंग्लंड देशांतून आणून त्यांस भाषा वगैरे शिकउन त्यांस देतात. त्यांचे हाताखालीं किरकोळ कामें आहेत तीं हिंदु लोकांस देतात. परंतु हिंदु लोक जों जों इंग्रज लोकांसारखे ब्राह्मणे होत जातील तसतशी सरकारांतून त्यांस मोगले हुद्यावर नेण्याची रीति चालू होईल. परंतु सांप्रत याप्रमाणें आहे ये विषयीं "युनीवर्सल हिष्टरी" हा ग्रंथ कलकत्यास एका ब्राह्मणे साहेबानें केला आहे त्यांतून पान १५१ यांतील कांहीं भाग उतरून घेतों.

"हिंदुस्थानांतील लोकांमध्यें अपसांतील भेद व द्वेष इतके पुष्कळ व संतत चालत आले आहेत कीं त्याजमुळें विद्या व ब्राह्मणपणाचा अगदीं ऱ्हास झाला व विद्या व ब्राह्मणपण नाहीं ह्मणून मोठे अंमलदारीचें काम करण्याजोगा व लोकांचें हित पाहावयाजोगा एकही मनुष्य नाहीं हिंदु लोकांमध्यें विद्या कांहीं आहे ती केवळ निरुपयोगी आहे. भांडण व व्राद विवाद करण्याची मात्र आहे. उपयोगी

विद्या कांहीं नाहीं. आणि असली विद्या आहे ती तरी सर्वांस नाहीं. फक्त मध्यम प्रतीचे ब्राह्मण जातींत मात्र आहे. जे श्रीमंत व थोर व जे गरीब व शेती भाती करणारे ते अगदी अडाणी व मूर्ख असतात. राज्य करणें व राज्याचे बंदोबस्त व नेम हे कोणास ठाऊक नाहींत व कळत नाहींत. व हिंदूंचीं पुस्तकें जीं आहेत त्यांत असल्या उपयोगी गोष्टी कांहीं नाहींत. याजमुळें पूर्वी या देशांत बहुधा असें असे कीं जेव्हां चांगला राजा होईल तेव्हां राज्य चांगलें करी व वाईट होईल तेव्हां वाईट करी राज्यनीतीस एकसारखेपणा कांहीं नव्हता. यास्तव इंग्रजसरकार हिंदुलोकांस बहुत मान्य आहे. पहिली बेदाद व दंगे व बंडे व वाटमारे; बहूत असत. ते सर्व नाहींसे झाले. स्वस्थपणा अधिक झाला आहे. आणि जरी इंग्रज सरकारचे मनांत बेत आहेत तितके सर्व सिद्धीस जात नाहींत तथापि हें सरकार चांगलें आणि लोककल्याणास मनापासून झटणारें आहे."

इंग्रजी सरकारांत विद्यावृद्धीचा यत्न फार आहे. याजमुळें लोक शाहाणे होऊन उपयोगी विद्या शिकूं लागले आहेत. हें पूर्वीं कोणचेच राज्यांत नव्हतें. सरकारांतून लोकांकरितां शाळा, पुस्तकगृहें, मंडळ्या, नवीनग्रंथ होणें, वगैरे हें इंग्रजी राज्यांतच झालें आहे. हल्लीं जीं राज्यें हिंदू व मुसलमान लोकांचीं आहेत तेथें विद्यावृद्धीविषयीं कांहीं उद्योग करीत नाहींत हें काम सरकारचें आहे असें देखील समजत नाहींत. व राजापासून प्रजेपर्यंत एकसारखी समजूत असने या एकच कारणावरून जरी इतर कारणें एकीकडे ठेविलीं तरी इंग्रजी राज्य हिंदुलोकांस लाभदा

यक आहे असें सिद्ध होतें.

इंग्रेजी राज्यांत मोठे रोजगार सर्व त्यांचेच जातीचे लोकांकडे आहेत व व्यापार अगदी कमी झाला याजमुळें पैशाची तूट फार पडून लोक दरिद्रानें पीडीत झाले आहेत असें पूर्वीच्या कोणत्याही राज्यांत झाले नव्हते. ही गोष्ट खरी आहे परंतु यास उपाय इतकाच कीं प्रमाणिकपणा विद्वानपणा इत्यादिक गुण जे मोठे पदवीस अवश्य आहेत ते लोकांमध्यें आले ह्मणजे सरकार सहजच इकडील लोकांस मोठी कामें देईल व असा सरकारचा ठरावही आहे आणि दुसरें असें आहे कीं विलायती कला कौशल्यें इकडे आणण्याचा प्रयत्न करून व्यापार वाढविला पाहिजे. या दोन्ही गोष्टी नकरितां हाली आहेत तसे जर आमचे लोक झोपेंत डुलक्या घेतच राहिले तर इतकेंच होईल कीं थोडे दिवसांत फक्त मजुरी ओझें उचलणें हेलकरीपणा करणें घोडें संभाळणें अशी हलकीं कामें मजुरीचीं आहेत तेवढीं मात्र या लोकांकडे राहतील बाकी सर्व कामें यांच्याहून शाहणे जे परकी लोक ते संभाळतील या भयंकर परिणामास भिऊन लोकानी विचार करावयाशि लागावें ह्मणजे उपाय सुचतील.

---

समाप्त.